# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

### राज्यात शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक रोखण्यासाठी कायदा करण्याबाबत

**(१) ६१६० (१३-१२-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचा शेतमाल खाजगी व्यापाऱ्यांनी खरेदी केल्यानंतर शेतकऱ्याला मालाची ठरलेली किंमत न देता कमी रक्कम देणे, शेतकऱ्यांना त्याच पैशासाठी पुन्हा-पुन्हा फेऱ्या माराव्या लागणे तसेच दिलेल्या रक्कमेत बनावट नोटा देऊन शेतकऱ्यांची लूट करण्यात येत असल्याच्या तक्रारी अनेक शेतकऱ्यांनी संबंधित कृषी अधिकारी तसेच पोलिसांकडे करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरुन नाशिक विभाग पोलिसांनी कारवाई करुन शेतकऱ्यांची फसवणूक झालेली रक्कम रुपये ५ कोटी शेतकऱ्यांना मिळवून देऊन अन्य १६६ व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी (सन २०२०) रक्कम देण्याचे लेखी स्वरुपात लिहून घेतले असल्याचे दिनांक २ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात मा.गृहमंत्री जळगाव जिल्ह्याच्या शासकीय दौऱ्यावर असताना, शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यापाऱ्यांकडून होत असलेल्या फसवणूकीबाबत त्यांच्याकडे तक्रारी केल्या असून राज्यात शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार असल्याचे मा.गृहमंत्री यांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०२-२०२२) :** (१) राज्यातील शेतकऱ्यांचा शेतमाल खाजगी व्यापाऱ्यांनी खरेदी केल्यानंतर शेतकऱ्याला मालाची ठरलेली किंमत न देता कमी रक्कम देणे, शेतकऱ्यांना त्याच पैशासाठी पुन्हा-पुन्हा फेऱ्या माराव्या लागणे बाबतच्या तक्रारीनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त राज्यात शेतकऱ्यांना दिलेल्या रक्कमेत बनावट नोटा देवून त्यांची लूट करण्यात येत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रात एकूण १८२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये रुपये ३५,६२,०००/- इतकी रक्कम शेतकऱ्यांना मिळाली आहे. तसेच पोलीस विभागाकडे दाखल १२४७ तक्रारी मध्ये तडजोड अंती १८२ शेतकऱ्यांना रुपये २,४८,६५,७७८/- इतकी रक्कम मिळालेली आहे. तसेच दाखल गुन्ह्यातील २३० गैरर्जदारांनी रुपये ३,८०,१६,०३९/- इतकी रक्कम देण्याचे लेखी आश्वासन दिले असून त्याबाबत पाठपुरावा चालू आहे.
पोलीस अधीक्षक, जळगांव यांच्या कार्यक्षेत्रात ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यातील फसवणुकीची रक्कम रुपये १,५२,०४,२९४/- पैकी रुपये ९,३२,०००/- इतकी रक्कम ०७ व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना परत केली आहे.

पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांच्या कार्यक्षेत्रात ०२ गुन्हे दाखल असून त्यातील फसवणुकीची रक्कम रुपये ३७,१०,१७९/- इतकी मिळवुन देण्यात आली आहे.

सारंगखेडा येथील १२ शेतकऱ्यांना रुपये ५,५८,७०१/- इतकी मिळवुन देण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक, धुळे यांच्या कार्यक्षेत्रात प्राप्त तक्रारीनुसार ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्हे अधिकच्या तपासावर आहेत.

पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांच्या कार्यक्षेत्रात प्राप्त तक्रारीनुसार १४ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्हे अधिकच्या तपासावर आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) राज्यात १६ घटकात एकूण ४५ गुन्हे दाखल करण्यात आले असून जिल्हा घटकातील पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना कारवाई करणेबाबत आदेश सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याबाबत

**(२) ६६७९ (१६-०३-२०२१) श्री.महादेव जानकर** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारी तसेच विस्तारामुळे शहरात आणखी सहा नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कधीपर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरात सहा नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०२-२०२२) :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक पुणे (ग्रामीण) यांच्या आस्थापनेवर नवीन सुपा पोलीस ठाणे दिनांक १०/११/२०२१ च्या शासन निर्णयाव्दारे व पारगांव (कारखाना) पोलीस ठाणे दिनांक ९/१२/२०२१ च्या शासन निर्णयाव्दारे, तर नवीन माळेगाव, ऊरळीकांचन, निरा-नृसिंहपूर पोलीस ठाणे व शिरूर पोलीस उपविभागीय कार्यालय इ. दिनांक १३/१२/२०२१ च्या शासन आदेशाव्दारे निर्माण करण्यात आली आहेत.

तर, पोलीस आयुक्त, पुणे (शहर) यांच्या आस्थापनेवरील अस्तित्वात असलेल्या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून बाणेर, नांदेड सिटी, खराडी,काळेपडळ, फुरसुंगी व आंबेगाव अशी ६ पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक यांनी शासनास दिनांक २४/३/२०२१ रोजीच्या पत्राव्दारे सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.त्यावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या त्रृटींच्या अनुषंगाने माहिती पोलीस महासंचालक कार्यालयाकडून मागविण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे माहिती शासनास प्राप्त झाल्यानंतर, उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उल्हासनगर शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या नियमानुकुल इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत

**(३) ९४३२ (१८-०६-२०२१) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात सन १९९४ साली उभारण्यात आलेली कॅम्प एक मधील मोहिनी पॅलेस या चार मजली इमारतीच्या टेरेसचा स्लॅब कोसळून तळ मजल्यापर्यंत खाली आल्याने इमारतीमधील ३० ते ३२ नागरिक त्यात अडकल्याचे दिनांक १५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९० मध्ये उल्हासनगर शहरात मोठ्या प्रमाणावर उलवा रेतीचा वापर करून बांधण्यात आलेल्या इमारती कोसळण्याचे प्रकार गत काही वर्षांपासून सुरू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात नियमानुकूल प्रक्रिया गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे इमारतीच्या पुनर्बांधणीचे प्रस्तावही प्रलंबित असल्याने जुन्या व मोडकळीस आलेल्या नियमानुकुल इमारतींचे तातडीने पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याचे ६५२६ अर्ज २००६ मध्ये प्राप्त झाले. त्यापैकी २००१ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून १६५ प्रकरणांत शुल्क भरण्यात आलेले आहे. १८३६ प्रकरणात आवश्यक शुल्क भरलेले नाहीत. शुल्क भरलेल्या प्रस्तावापैकी ९७ प्रकरणात डी फार्म देण्यात आलेला असून उर्वरित प्रस्तावामध्ये डी फार्म जारी करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच शासनाने दिनांक ०९/०९/२०१९ रोजी पदनिर्देशित प्राधिकारी म्हणून आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी नियुक्ती केल्यानंतर अनधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याचे एकूण ४९३५ ऑनलाईन प्रस्ताव प्राप्त झाले असून त्याची छाननी महानगरपालिका स्तरावर सुरु आहे. तसेच शासनाने दिनांक २७/०७/२०२१ रोजी उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधिन करणे अधिनियम, २००६ मध्ये सुधारणा सुचविण्याबाबत अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय दुध योजनेकरीता निश्चित केलेल्या दुध खरेदीच्या दराप्रमाणे सर्व दुध उत्पादकांना दर मिळण्याबाबत

**(४) १०१७६ (०६-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुग्धव्यवसाय क्षेत्रात शासनाचा वाटा केवळ १% इतकाच असून उर्वरित दुग्धव्यवसाय सहकार व खाजगी क्षेत्राकडून केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत केवळ शासकीय दुध योजनेंतर्गत संकलित होणाऱ्या दुधाचे खरेदी व विक्री दर निश्चित करण्यात येत असून खाजगी व सहकार क्षेत्रामार्फत दुध खरेदी-विक्रीचे दर त्यांचेमार्फत परस्पर निश्चित करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अभ्यासगटाने केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरुप काय आहे, या शिफारसीबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय दुध योजनेकरीता निश्चित केलेल्या दुध खरेदीच्या दराप्रमाणे दुध उत्पादकांना दर मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१४-०२-२०२२) :** (१) सद्य:स्थितीत राज्यातील दुग्ध संकलनात शासनाचा वाटा ०.४०% इतका आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या अभ्यासगटाने सर्वसाधारणपणे दूध उत्पादक शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा अशी शिफारस केली आहे. शेतकऱ्यांच्या दुधाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी शासन वेळोवेळी प्रोत्साहनपर अनुदान योजनांच्या माध्यमातुन हस्तक्षेप करीत असते. तसेच उसाच्या धर्तीवर दुधासाठी रास्त व किफायतशीर भाव मिळण्यासाठी कायदा लागू करण्याबाबत व्यवहार्यता तपासण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(५) १०४०२ (२३-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.कपिल पाटील, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचारी हे तुटपुंज्या मानधनावर काम करीत असून त्यांनी कोविड काळात घराघरात जाऊन काम केले असून त्यांच्या मानधनात वाढ करावी, आजारी असल्यास शासनाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन भर पगारी रजा मिळावी, सेवानिवृत्तीनंतर पेन्शन मिळावी, मोबाईल नादुरुस्त झाले तर नवीन मोबाईल मिळावे, सेवानिवृत्तीनंतरचे वेतन वेळेवर मिळावे अशा विविध मागण्या अंगणवाडी कर्मचारी सभा, महाराष्ट्र या संघटनेने केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांचे कामकाज ऑनलाईन करण्यासाठी सन २०१९ मध्ये पोषण अभियानांतर्गत महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात आलेले मोबाईल फोन निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मोबाईलमध्ये लाभार्थी यादी, वजन, हजेरी, उंची, स्तनदा माता, गर्भवती महिलांची माहिती व पोषण आहाराचे वाटप इत्यादी माहिती नोंद केली जाते परंतु, मोबाईलचा कालावधी संपल्याने गेल्या दोन वर्षात सेविकांचे काम वाढले असून मोबाईलच्या दुरुस्तीचा खर्च वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने दिलेले जुने मोबाईल परत घेऊन नवीन चांगल्या दर्जाचे आधुनिक मोबाईल देण्यात यावेत व पोषण ॲप मराठी असावे अशी मागणी असल्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये मोबाईलवापसी व डहाणू तालूक्यातील अंगणवाडी सेविकांनी एकात्मिक बालविकास अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बहुतांश ग्रामीण भागात मोबाईलवर इंटरनेट सुविधा व्यवस्थित चालत नसल्याच्या तक्रारी महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी कृती समितीने शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंगणवाडी सेविकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१६-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.

पोषण ट्रॅकर हे ॲप्लीकेशन केंद्र शासनाचे असून ते मराठी भाषेमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) अंगणवाडी सेविकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात ज्या कंपनीचे इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत त्या कंपनीचे सिम कार्ड इंटरनेट सुविधेसह घेण्याची मुभा देण्यात आली होती. त्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीमधून अंगणवाडी सेविकांनी ही खरेदी केली आहे. राज्यात इंटरनेट सुविधा व्यवस्थित उपलब्ध असून पोषण अभियान हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राबविण्यात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रा.उमरी (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील श्रीमती धुमाळ स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेपासून वंचित राहिल्याबाबत

**(६) १०५३१ (०६-०१-२०२२) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आनंद सखाराम धुमाळ रा.उमरी (ता.अर्धापूर, जि.नांदेड) यांचा दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजी पाण्यात बुडून मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबियांना स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत आर्थिक मदत

मिळण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १९ नोव्हेंबर, २०१९ रोजी कृषी कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड यांच्याकडे श्रीमती धुमाळ यांनी दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नसून श्रीमती धुमाळ विमा योजनेच्या मदतीपासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्रीमती धुमाळ यांना स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत मदत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव श्री.आनंद सखाराम धुमाळ नसून श्री.आनंद सखाराम मुधळ असे आहे. श्री.मुधळ यांचा दिनांक ९/०८/२०१९ रोजी विहिरीत पाण्यात बुडून मृत्यू झालेला आहे. श्रीमती मुधळ यांनी सदर योजनेंतर्गत दिनांक १९/११/२०१९ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे प्रस्ताव दाखल केला होता.परंतु सदर प्रस्तावाची छाननी केली असता त्यामध्ये कागदपत्रांच्या त्रुटी असल्याचे निदर्शनास आले. विमा कंपनीमार्फत सदर प्रस्तावामध्ये वयाचा पुरावा, पोलीस अंतिम अहवाल व प्रस्ताव विलंबाने सादर केल्याबाबतचे स्पष्टीकरणांसदर्भात वारसदाराचे पत्र इ. त्रुटी असल्याचे संबंधितास कळविण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड यांनी देखील संबंधित वारसदारास कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत त्यांचे पत्र जा.क्र./तं-४/गोमुशेअवि/५००/२२, दिनांक २७/०१/२०२२ अन्वये कळविलेले आहे.

(३) अपघातग्रस्त लाभार्थ्यांचा विमा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी विमा कंपनीकडे सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे चि.आदर्श राकेश मिश्रा याचा सर्पदंशामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(७) १०५३८ (०३-१२-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे एन्टीव्हॅनम औषधाच्या अभावामुळे चि. आदर्श राकेश मिश्रा याचा सर्पदंशामुळे मृत्यू झाला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कु. आदर्श याचा मृत्यू दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ रोजी लता मंगेशकर हॉस्पीटल, नागपूर येथे झाला असतानाही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे दिनांक ९ ऑगस्ट, २०२१ रोजी वार्ड नं. ०६, बेड नं. ३३ वर दाखल असल्याचे दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे एन्टीव्हॅनम औषध उपलब्ध असूनही रूग्णाला औषध नसल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रुग्णाच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द कारवाई करुन मृताच्या परिवाराला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०३-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यात वाढलेले कुपोषित बालकांचे प्रमाण रोखण्याबाबत

**(८) १०६०७ (२३-११-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात सहा वर्षाखालील कुपोषित बालकांच्या शोध मोहिमेत १ हजार २२८ अतितीव्र व ६ हजार ८७७ मध्यम कुपोषित बालके आढळून आल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात एवढया मोठ्या प्रमाणात कुपोषित बालके आढळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद जिल्ह्यात वाढलेले कुपोषित बालकांचे प्रमाण रोखण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१६-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १५/०८/२०२१ ते ३०/०८/२०२१ या कालावधीमध्ये संपूर्ण राज्यात SAM (अतितीव्र कुपोषित) बालके शोधण्यासाठी विशेष शोध मोहिम राबविण्यात आली होती त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यामध्ये १३४३- SAM (अतितीव्र कुपोषित) व ६२४४- MAM (मध्यम कुपोषित) बालके आढळून आली आहेत.

(२) कुपोषणाचे प्रमाण वाढीसाठी खालील कारणे प्रामुख्याने दिसून येतात.

१. जन्मत: मुलांचे कमी वजन (२५०० ग्रॅमपेक्षा कमी).
२. गरोदरपणातील आरोग्याची काळजी.
३. गरोदरपणातील रक्तक्षय व बाळंतपण दवाखान्यात न होणे.
४. प्रसूती दरम्यान व प्रसूती पश्चात निर्माण झालेल्या समस्या.
५. मुलांचे दिर्घ आजार.
६. आजारपणातील उपचाराची तत्परता व गुणात्मकता.
७. अशुध्द पाणीपुरवठा.
८. गरिबी.

९. कमी वयात गरोदरपणात, वारंवार गर्भारपण तसेच दोन प्रसूतीमधील कमी अंतर.

१०. महिलांमध्ये आरोग्य व पोषण विषयक शिक्षणाचा अभाव.

११. जनजागृतीचा अभाव.

(३) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना कोविड १९ मुळे गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्यात येतो.

२. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी निरंतर शिक्षण वृद्धीदृष्टीकोन (ILA), समुदाय आधारीत कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहे.

३. तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील घाटी रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याबाबत

**(९) १०६०८ (२३-११-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील घाटी रुग्णालयात मोठ्या प्रमाणात औषधांचा तुटवडा असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात औषध टंचाई असल्याने गरीब रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना बाहेरुन औषधे आणावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घाटी रुग्णालयाला हाफकीनकडून दीड ते दोन महिने पुरेल इतका औषध साठा प्राप्त झाला असून औषधी उपलब्ध असतानाही डॉक्टरांकडून रुग्णांना उपलब्ध औषधांऐवजी नवनवीन औषधी लिहून दिली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गरीब रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयातील उपलब्ध औषधे पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये बाहेरून औषधे आणावी लागतात.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जायकवाडी (ता.पैठण, जि.औरंगाबाद) धरणाच्या जलविद्युत केंद्रातून वीज निर्मिती करण्याबाबत

**(१०) १०६२१ (०६-०१-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी (ता.पैठण, जि.औरंगाबाद) धरणाच्या जलविद्युत केंद्रातून वीज निर्मिती करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदामंत्री यांच्याशी दिनांक २८ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहाराबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१४-०२-२०२२) :** (१) होय.

(२) सदर जलविदुयत प्रकल्प नोव्हेंबर, १९८४ मध्ये जलसंपदा विभागाकडून कार्यान्वित करुन महाजनको (तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) कडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींचे पत्रव्यवहाराचे अनुषंगाने महाजेनको यांचेकडून करण्यात येत असलेल्या आवश्यक दुरुस्तीकरीता सर्वतोपरी सहकार्य जलसंपदा विभागाचे अधिनस्त संबंधित कार्यालयांकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) मधील सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांनी लाच घेतल्याबाबत

**(११) १०६७० (०६-०१-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) मधील सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांनी बांधकामाचे मुल्यमापन अहवाल देण्यासाठी एका जमीन मालकाकडून रुपये एक लाखाची लाच घेतल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लाचखोर अभियंत्याला अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२८-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय.

आरोपी लोकसेवक शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कल्याण यांचेविरुध्द महात्मा फुले चौक पो.स्टे. गुन्हा नोंद क्र. ६२७/२०२१ प्रमाणे दाखल गुन्हयात दिनांक १४/०९/२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) आरोपी लोकसेवक शाखा अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, कल्याण यांचेविरुध्द उक्त प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

आरोपी लोकसेवक यांचेविरुध्द दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १८/१०/२०२१ च्या आदेशाद्वारे त्यांना दिनांक १४/०९/२०२१ रोजी पासून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## जिल्हा सामान्य रूग्णालय, परभणी येथील अधीक्षक यांचे जात प्रमाणपत्र व इतर गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत

**(१२) १०६८५ (२३-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रूग्णालय, परभणी येथील अधीक्षक यांचे जात प्रमाणपत्र व इतर गैरप्रकाराच्या अनुषंगाने मुद्देनिहाय चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांनी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्याकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यावर जात प्रमाणपत्र व इतर प्रकरणाच्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.बालाजी काळे पाटील कार्यकारी संपादक लोकपुकार यांचे दिनांक १६/१०/२०१४ रोजीच्या पत्रानुसार जिल्हा रुग्णालय, परभणी येथील सहाय्यक अधीक्षक यांची जात प्रमाणपत्र व इतर गैरप्रकाराच्या अनुषंगाने तक्रार केली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी येथील संबंधित अधीक्षक यांचे जातवैधता प्रमाणपत्र हे त्यांच्या नियुक्तीपूर्वीचे होते. त्याआधारे त्यांना नियुक्ती देण्यात आली होती. सदर जात वैधता प्रमाणपत्र उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ३०/०७/२०२१ च्या पत्रानुसार पुनर्तपासणीसाठी सदस्य सचिव, अनुसूचित जाती जात वैधता तपासणी समिती, नाशिक विभाग नाशिक यांचेकडे पाठविलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील फेरफार नोंदी प्रलंबित असल्याबाबत

**(१३) ११२३७ (०६-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नोंदणी कार्यालयात दस्त नोंदणी झाल्यानंतर ३० दिवसांत फेरफार नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सोलापूर जिल्ह्यातील ६४८७ फेरफार नोंदी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ३० दिवसांपेक्षा अधिक दिवस प्रलंबित असलेल्या फेरफार नोंदी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यात सुरु असलेल्या ई फेरफार प्रणालीअंतर्गत शासनाच्या दिनांक ०४/०७/२०१९ रोजीच्या परिपत्रकामधील निदेशानुसार सर्व महसुली अधिकाऱ्यांसमवेत साप्ताहिक आढाव्याद्वारे सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित फेरफार निर्गत करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्तरावर घेण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत मुलांना शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचे दिले असल्याबाबत

**(१४) ११४१७ (२३-११-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: नागपूर शहरात ९८१ अंगणवाड्यात एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत दिले गेलेले शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोषण आहार भेसळयुक्त असल्याचे लोकमत समूहाने केलेल्या सर्व्हेक्षणात दिसून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत पुरवठा धारकावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१६-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नागपूर येथे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत देण्यात येणारा आहार निकृष्ट व भेसळयुक्त असल्याबाबत दिनांक ०४/०९/२०२१ वा त्यासुमारास तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, माहे जुलै, २०२१ मध्ये IBN लोकमत या वृत्त वाहिनीवर निकृष्ट आहाराबाबत बातमी प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक ०६/०७/२०२१ रोजी आहाराचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेवून शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नागपूर येथील प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविले होते, त्यानुसार सदर आहार Food Safety & Standards Regulation २०११ प्रमाणे खाण्यास योग्य असल्याबाबत प्रयोगशाळेकडून प्रमाणित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारुर (जि.बीड) येथील मस्जिदची इनामी जमीन बेकायदेशीर खाजगी व्यक्तिंच्या नाव केल्याबाबत

**(१५) ११४६४ (०५-०१-२०२२) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारुर (जि.बीड) येथील मस्जिदची ४४ एकर इनामी जमीन रुपये ३६२ ला अधिकार नसताना चार खाजगी व्यक्तिंच्या नावे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी कार्यक्षेत्राबाहेर असल्याने अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे वर्ग केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणात अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई व संबंधित अधिकाऱ्यांनी न्यायीक अधिकाराचा गैरवापर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२५-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) याप्रकरणी उपजिल्हाधिकारी (सामान्य) भूसुधार यांनी पारित केलेले दिनांक १८/०२/२०२० रोजीचे आदेश अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या आदेशानुसार रद्द केले आहेत. तसेच सद्य:स्थितीत सदर प्रकरण विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. तसेच याप्रकरणी आदेश पारित करणारे तत्कालीन उपजिल्हाधिकारी (सामान्य) भूसुधार, बीड यांना दिनांक १४/०१/२०२२ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

---

## राज्यात जिल्हा परिषदांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळेतील पात्रता धारक शिक्षकांना प्रशासकीय वर्ग-१ व वर्ग-२ मधील पदांवर सामावून घेण्याबाबत

**(१६) ११५२६ (०६-०१-२०२२) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदेमार्फत वरिष्ठ महाविद्यालये चालविण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जिल्हा परिषदांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये नेट/सेट (युजीसी) पीएच.डी. पात्रता धारक किती शिक्षक आजमितीस सेवेत कार्यरत आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पात्रता धारक शिक्षकांना इतर महाविद्यालयात पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने त्यांना प्रशासकीय वर्ग-१ व वर्ग-२ मधील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, प्राचार्य, जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयामध्ये असलेल्या पदांवर सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१२-०४-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यामध्ये अंदाजे १००० च्या आसपास नेट/सेट पीएच.डी पात्रता धारक शिक्षक कार्यरत आहेत.

(३) व (४) महाराष्ट्र शिक्षण सेवेतील गट अ व ब च्या पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत तर, जिल्हा परिषदेतील गट क मधील पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येते. राज्य शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील मंजूर पदांसाठी अनुक्रमे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६० च्या कलम २७४ खाली तयार केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ खाली अधिसूचित केलेल्या त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनूसार नियुक्त्या केल्या जातात. सध्या उच्च अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना, मागणी केलेल्या पदांवर सामावून घेण्याची तरतूद नसल्यामुळे सदर मागणीप्रमाणे पुढील कार्यवाही करणे शक्य नाही, असे करणे असंविधानिक ठरेल.

---

## सडक अर्जुनी (जि.भंडारा) तालुक्यातील ग्रामीण भागातील पशुपालक जनावरांच्या गोठ्यापासून वचिंत राहिल्याबाबत

**(१७) ११६१२ (०६-०१-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक अर्जुनी (जि.भंडारा) तालुक्यातील ग्रामीण भागातील पशुपालक जनावरांच्या गोठ्यापासून वचिंत राहिल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पशुपालकांना जनावरांसाठी गोठा देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात सन २०२१ या आर्थिक वर्षात ४५ गोठ्यांचे अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ३१ अर्ज छानणी अंती पात्र ठरले आहेत. त्यापैकी ९ गोठ्यांची कामे पूर्ण झाली असून ८ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित १४ गोठ्यांची कामे सेल्फवर ठेवण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाड्यांमधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(१८) ११६२८ (२३-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोंदिया जिल्ह्यातील ६९ अंगणवाड्यांची भरती प्रक्रिया थांबविण्याबाबत एकात्मिक बालविकास योजनेने पत्र दिले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागात अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या सुमारे ४०० जागांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून या सेविकांना नियुक्ती आदेश देण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदभरतीसाठी उमेदवारांना कोविडच्या पार्श्वभुमीवर वयोमर्यादा ३० वर्षाऐवजी कमाल मर्यादा ३२ वर्षापर्यंत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडी सेविकांना रिक्त जागा असतानाही तात्काळ नियुक्ती आदेश न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच, राज्यातील अंगणवाड्यांची भरती प्रक्रिया कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील अंगणवाड्यांमधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत व त्यांना नियुक्तीचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१६-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

राज्यात अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांचे पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे. प्रक्रिया पूर्ण झालेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना नियुक्ती आदेश देण्यात येत आहेत.
(३) हे खरे आहे.

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी दिनांक १३/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेल्या ३० वर्षाची वयोमर्यादा शिथील करुन त्यामध्ये दोन वर्षाची वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली असून ही शिथिलता केवळ कोव्हिड प्रादुर्भावामुळे पदभरतीस झालेल्या विलंबामुळे करण्यात आलेली असल्याने ती मर्यादित कालावधीसाठी म्हणजे दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत होणाऱ्या पदभरतीसाठीच लागू राहणार आहे.
(४), (५) व (६) एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे रिक्त पदांच्या भरती संदर्भात शासन निर्देशानुसार जिल्हा / प्रकल्प स्तरावर रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे. भरती प्रक्रिया पूर्ण होणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत १५८९ अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, व ७११ अंगणवाडी मदतनीस यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

## कोकणातील बेदखल कुळांना कुळ कायद्याचा लाभ देण्याबाबत

**(१९) ११६४२ (०५-०१-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कुळ कायदा करुन कसेल त्याला जमीन यासंदर्भात धोरण ठरविले असून अद्याप कुळ कायद्याचा प्रश्न प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुळ कायद्यातील त्रृटींमुळे कोकणातील बेदखल कुळांना त्याचा लाभ होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुळ कायद्यातील त्रृटी दुरुस्त करुन या कायद्याचा लाभ कोकणातील बेदखल कुळांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) या विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १२/९/२०१४ अन्वये, कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांच्या समस्यांचे सर्वंकष अभ्यासाकरीता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. यासंदर्भात विभागीय आयुक्त यांच्या दिनांक १९/०१/२०१७ च्या पत्रान्वये, सदर समितीने अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही चालू आहे. या अनुषंगाने, शेतमजुर/ कारागिर यांच्या राहत्या घराच्या समस्या सोडविण्यासाठी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये अनुषंगिक सुधारणा करण्यात आली असून, त्या अंतर्गत केलेल्या नियमांन्वये क्षेत्रिय स्तरावर अभिलेख तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबेजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस वाढीव रुग्णखाटांसाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(२०) ११६९२ (२५-११-२०२१) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबेजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस वाढीव रुग्णखाटांसाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव अधिष्ठाता यांचेकडून संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे दिनांक २ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडून दिनांक १४ मार्च, २०२० रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्तावाधिन त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कळविण्यांत आल्यानंतर प्रस्तावाधिन त्रुटींची पुर्तता करुन दिनांक २० जुलै, २०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रलंबित असलेल्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.